# लवकरच भुयारातून प्रवास

## स्थापत्य कामे ८२ टक्के पूर्ण; स्थानकांची ७९ टक्के कामे झाली



लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पहिल्या वहिल्या मुंबई मेट्रो - ३ च्या भुयारी मार्ग प्रकल्पाचे काम सध्या सुसाट सुरू आहे. आतापर्यंत ७१.५० टक्के काम पूर्ण झाले आहे. तर स्थापत्य कामे ८२ टक्के पूर्ण झाली आहेत. तर प्रणालीविषयक कामे ३४ टक्के पूर्ण झाली. स्थानकांची कामे ७९ टक्के झाली आहेत.

प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून भुयारीकरणाचे उर्वरित काम पॅकेज - ३ अंतर्गत महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल दरम्यान सुरू आहे. स्टेशन बॉक्सच्या काँक्रिटिंगसह काही स्थानकांच्या पुनर्भरणाचे काम करून देण्यासाठी खोल्या बांधण्याचे काम आहे.

### विमानतळ स्थानक पूर्ण

- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापक संचालक रणजितसिंग देओल या कामाचा सातत्याने आढावा घेत आहेत. नुकतेच देओल यांनी मेट्रो-४ ची पाहणी केली आहे.
- या पाहणीवेळी प्रकल्प विभागाचे संचालक सुबोध गुप्ता आणि प्रणाली विभागाचे संचालक अजय भट्ट उपस्थित होते. एम. आय. डी. सी. सीप्झ, विधानभवन, मरोळ नाका, कफ परेड, सिद्धिविनायक, चर्चगेट, हुतात्मा चौक, मुंबई सेंट्रल आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ या स्थानकांचे ८० टक्क्यांहून अधिक बांधकाम पूर्ण झाले आहे.





भुयारी मेट्रोचे काम अंतिम टप्प्यात आले असून येत्या काही दिवसांत मुंबईकरांच्या सेवेत दाखल होणार आहे.

- एकूण नऊ स्थानकांचे तिन्ही स्लॅबचे बेस स्लॅब, काँकोर्स स्लॅब आणि रूफ स्लॅब **१००%** बांधकाम पूर्ण झाले आहे.



- तर मेट्रो-३ च्या रूळ बांधणीचे काम प्रगतिपथावर असून **२२%** काम पूर्ण झाले आहे.